● सोमवार, दि ७ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ७६ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जगदंबा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जालना विधानसभा जागा भाजपाकडे मिळवण्यासाठी प्रयत्न करणार

## जालना विधानसभा भाजपा बहुमताने जिंकणार

### माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचा दावा

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभेची जागा भाजपकडे मिळण्यासाठी भाजपा कार्यकर्त्यांच्या व पदाधिकारी यांच्या भावना लक्षात घेऊन प्रदेश भाजपाकडे प्रयत्न करणार असून जालना विधानसभेची जागा भाजप बहुमताने जिंकणार असल्याचा दावा माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी भाजपा महा कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना जालना येथे व्यक्त केले.

जालना येथे भाजपाचा महा कार्यकर्ता मेळावा व सदस्यता नोंदणी अभियान येथील गोकुळ लॉन्स येथे संपन्न झाला यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे हे पदाधिकार यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, जालना विधानसभेमध्ये भारतीय जनता पार्टीची ताकद आहे त्यामुळे भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या पाठीवरच जालना विधानसभा भाजपा लढविल्यास भाजपा उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येणार आहे. जालना शहरासाठी व ग्रामीण साठी अनेक विकासाचे योजना राबविल्या व २०० कोटी रुपयांचे जालना रेल्वे स्टेशन व ३०० कोटी रुपयांचे छत्रपती संभाजीनगरचे रेल्वे स्टेशनचे काम चालू आहे. माजी मंत्री असताना जालना लोकसभा मतदारसंघात ६०० कोटी रुपयांचे सिमेंट रस्त्याचे कामे केली असून अनेक विकास प्रकल्प जालना शहरात मंजूर केले आहे केंद्र व राज्य शासनाकडून एका कुटुंबाला पीएम,सीएम किसान योजनेचे वार्षिक १२ हजार रुपये, महिलांना वार्षिक लाडकी बहीण योजनेचे १८ हजार रुपये, असे ३० हजार रुपये वर्षाला एका कुटुंबाला केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान मिळत असून अशा अनेक प्रकारच्या जनकल्याणकारी योजना शासन राबवीत आहे येत्या ९ ऑक्टोंबर २०२४ रोजी जालना येथील मेडिकल कॉलेजचे उदघाटन पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन होणार आहे त्यामुळे सर्वसामान्य जनतेला माहिती आहे की जालना येथील मेडिकल कॉलेज मंजुरीसाठी कोणी प्रयत्न केले. विकास कामाच्या जोरावर जालना विधानसभेची जागा भाजपा पक्ष श्रेष्ठींकडे मागणार असून त्याला पक्षाकडून मान्यता मिळणार मला विश्वास असल्याचे मत यावेळी श्री.दानवे यांनी व्यक्त केले आहे.



यावेळी आ. संतोष पाटील दानवे, जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे, घनसावंगी विधानसभा प्रमुख सतीश घाटगे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगर अध्यक्ष अशोक पांगारकर, प्रदेश कार्यकारणी सदस्य राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, विजय कामड, विमलताई आगलावे, सिद्धिविनायक मुळे, चंपालाल भगत, प्रतिक भैया दानवे, भागवत बावणे, कपिल दहेकर, धनराज काबलिये, देविदास देशमुख, सतीश जाधव, संध्याताई देठे, अनिल सरकटे, कैलास उबाळे, राजेंद्र भोसले, अमोल कारंजेकर, शिवराज जाधव, सुनील पवार, वसंतराव शिंदे, शुभांगी ताई देशपांडे, सुनील राठी, शशिकांत घुगे, संजय डोंगरे, बाबुराव शंकरराव भवर, सोमनाथ माणिकराव गायकवाड, रामलाल सुखलाल जाधव, आनंद शिवाअप्पा झारखंडे, सखुबाई गुलाब पणबिसरे, आनंत म्याका, श्रीकांत वसंतराव शेलगावकर, मनोज दविदराव बिडकर, सुमित सुधाकरराव सुरडकर, राजूदादा गवई, अमोल धानुरे, सय्यद इमरान, डोंगरसिंग साबळे, विष्णू डोंगरे, दुर्गेश कुरील, अरुणा जाधव, स्वाती जाधव, वर्षा ठाकूर, ममता कोंड्याल, शरदा काळे, मीना गायकवाड, मनीषा भोसले, गीता राजगुडे, वैशाली बनसोडे, वंदना ढगे, दिपाली बिन्नीवाले, परसराम तळेकर, सुधाकर खरात, ज्ञानेश्वर देव्हडे, बळीराम शिंदे, दत्ता बागल, बद्री वाघ, राहुल इंगोले, योगेश शिमगे, कृष्णा गायके, दत्ता जाधव, नारायण जाधव, चेतन देसरडा, प्रमोद गंडाळ, सुहास मुंडे, विकास कदम, परमेश्वर आप्पा हजबे, सुनील खरे, रामलाल जाधव, योगेश लहाने, अभिजित अंभोरे, सोमेश काबलिये, करण झाडीवाले, प्रभुलाल गोमतीवाले, रवि कायंदे, समर्पण विजयसेनानी, अकबर परसूवाले, शंकर काळे, नागेश अंभोरे, पंडित शिंदे, नामदेव नागवे, गोवर्धन उबाळे, कैलास सोळुंके, कृष्णा खिल्लारे, बद्रीनाथ वाघ, सतीशचंद्र प्रभू, अशोक वाघ, ज्ञानेश्वर राठोड, शरद सोनुने, राजाराम जाधव, भागवत जाधव, उद्धव ढवळे, सागर वाहूळकर, हरिभाऊ गोरे, शिवाजी गायकवाड, सतीश दाभाडे, दिगंबर सातपुते, शाम जाधव, कृष्णा चव्हाण आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जनतेचा विश्वास सार्थ ठरविण्याचा प्रयत्न केला - आ. गोरंट्याल

### दर्गावेस ते पाणीवेस रस्त्याच्या कॉंक्रिटिकरण कामाचा शुभारंभ



**जालना । प्रतिनिधी -** मतदार संघातील जनतेने ज्या विश्वासाने निवडून दिले. तो विश्वास सार्थ ठरवत मागील पाच वर्षांत आपण विधीमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात मतदार संघातील अनेक प्रश्न प्रभावीपणे मांडले. त्यामुळेच मतदार संघात विकासाची कामे खेचून आणता आली, असे प्रतिपादन आ. कैलास गोरंट्याल यांनी येथे बोलतांना केले.

जालना शहरातील प्रभाग क्रमांक २१ मधील दर्गावेस ते पाणीवेस या रस्त्याच्या नागरी दलितोत्तर योजनेतंर्गत सिमेंट कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ आ. कैलास गोरंट्याल यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा सौ. संगीताताई गोरंट्याल या होत्या. तर युवा नेते अक्षय गोरंट्याल, माजी नगरसेवक महावीर ढक्का, राम सावंत, विजय चौधरी, रमेश गौरक्षक, राजेंद्र वाघमारे, अशोक भगत, आरेफ खान, दुर्गेश काठोठीवाले, अतिक खान, मदन नारियलवाले, रणजीत मगरे, आसाराम ढवळे, श्रीकांत जाधव, इश्वर नारियलवाले, रामलाल साळुंखे, गणेशराव जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. गोरंट्याल म्हणाले की, विधानसभेत बोलण्यासाठीच पाठवले अशी टीका करणाऱ्यांनी चारवेळा आमदार आणि दोन वेळा राज्याच्या सत्तेत राज्यमंत्री असताना जालना मतदार संघाच्या विकासासाठी काय केले? असा सवाल उपस्थित करत त्यांच्या कार्यकाळात झालेले एकतरी मोठे काम दाखवा, असे आव्हान आ. कैलास गोरंट्याल यांनी यावेळी दिले. आपण मागील पाच वर्षांच्या कार्यकाळात विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात जालना मतदार संघातील अनेक प्रश्न प्रभावीपणे मांडून राज्य सरकारचे लक्ष वेधले. आपण विधानसभेत बोलल्यामुळेच जायकवाडी ते जालना पाणीपुरवठा योजना आणि आता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रश्न तडीस लावला असून, शहर व ग्रामीण भागातील अनेक प्रश्न मार्गी लावून विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केल्याचे ते शेवटी म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करतांना पान २ वर

युवा आदर्श

तू स्कंधमाता ...

माळ पाचवी गुंफता
रुप पंचमी जगन्माता
स्नेह कुंभ भरे तुडूंब
प्रतिपाळ करे जगता
पद्माश्रित तू करद्वया
यशस्विनी स्कंधमाता
शुभदास्तु सदा देवी
गं नित्य सिंहासनगता
भगवान स्कंद कमार
काखेत येतो आश्रिता
भय हरण होते सहज
आदिशक्ती शरणागता
पुजितो पंचमि ललिता
साधक सिध्द स्वागता
भर भरुन देशी संपदा
आदिजननी अभ्यागता
सूर्य मंडळ अधिष्ठात्री
प्रभा मंडल संयोगिता
उपासना हो अंतरातून
ध्यान वृत्तीत एकाग्रता
हरपले भान भक्ती रंगे
गरबा दांडिया खेळता
नर नारी भेद विरघळे
उत्साह अंगी सळाळता
नमस्तस्यै गं नमस्तस्यै
माता रूपेण संस्थिता
पुजा पाठ नित्य करता
विशुद्धचक्र अवस्थिता

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

सदर बाजार डीबी पथकाची कारवाई; ९ लाख पन्नास हजारांचा मुद्देमाल जप्त

## एका स्कार्पिओ, विद्युत ट्रान्सफार्मर, खंजीरसह चौघे ताब्यात

**जालना । प्रतिनिधी -** पोलीस ठाणे सदर बाजार जालना हद्दीत नवरात्र सणानिमित्त पेट्रोलीग करीत असतांना सदर बाजार पोलीसा ठाण्याच्या डिबी पथकाला मिळालेल्या माहितीनुसार महात्मा फुले भाजी मार्केट जालना या ठिकाणी काही चोरांनी विद्युत ट्रासफार्मर (डि.पी.) चोरी करीत आसतांना त्यांनी तेथील वॉचमेनला मारहाण केली आहे.

विद्युत ट्रासफार्मर (डि.पी.) चोरी करणारे चोर हे उतारगल्ली काद्राबाद जालनाच्या दिशेने पळाले आहे, अशी माहिती मिळाल्याने पोलीस पथक त्यादिशेने जावून चोराचा पाठलाग केला असता पळालेल्या चोराने पोलीसांच्या दिशेने दगडफेक सुरु केली. तेव्हा पोलीसांनी स्थानिक नागरीकांच्या मदतीने गल्ल्या बंद करुन दोन चोरांना उतारगल्ली काद्राबाद जालना येथून ताब्यात घेतले. ईतर दोन चोर पुन्हा तेथुन पुढे पळुन गेले. त्यांचा पाठलाग करीत असतांना ते दोन चोर अमरछाया टॉकीज उडपी चौकाजवळील घरावर लपुन बसले. त्यांना देखील स्थानिक नागरीकांच्या मदतीने पोलीसांनी ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या चोरांकडे प्राथमिक चौकशी केली पान २ वर



## महिला सुधारगृहातून दोन बेपत्ता तरुणींना शोधण्यात पोलीसांना यश

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील अंबड चौफुली परिसरात असलेल्या महिला सुधारगृहातून दोन तरूणी गायब झाल्याची घटना रविवार (दि. ६) रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास उघडकील आली. पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलीसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ तपास सुरु केला व दुपारी अडीच वाजेच्या दरम्यान दोन्ही बेपत्ता तरुणींना शोधण्यात पोलीसांना यश आले. मात्र, सुधारगृहातून मुली गेल्या कशा? सध्या ज्या जागेवर सुधारगृह आहे ती जागा सुरक्षित आहे का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील अंबड चौफुली परिसरात असलेल्या बाल सुधारगृहातून रविवार (दि ६) रोजी दोन मुली बेपत्ता झाल्याची घटना सकाळी ८ वाजता उघडकीस आली. या घटनेची माहिती मुलींच्या नातेवाईकांना लागताच त्यांनी तालुका पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यानंतर सुधारगृह प्रशासनाच्यावतीने तालुका पान २ वर

४१२.३० कोटी रुपयांची शासनाकडे नुकसान भरपाईची लोणीकरांची मागणी

## हे शेतकऱ्यांचे सरकार, नुकसान भरपाई लवकरच मिळेल

### आमदार लोणीकर यांचा विश्वास

**जालना । प्रतिनिधी -** अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना अनुदान स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील मदत देण्यात येते. ऑगस्ट व सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व सदस्य पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई देखील लवकरच मिळेल अशी माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली

केंद्र शासनाने विहित केलेल्या १२ नैसर्गिक आपत्तींव्यतिरिक्त राज्य शासनाने अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण व आकस्मिक आग या स्थानिक आपत्तींमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत देण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच शासन निर्णयान्वये सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती घोषित करण्यात आली आहे. त्यानुसार अवेळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या व त्यापुढील कालावधीसाठी अवेळी पाऊस व गारपीट व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता सुधारित दराने २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत्त अनुज्ञेय करण्यात आली आहे. अशी माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली

ऑगस्ट व सप्टेंबर, २०२४ या महिन्यात अतिवृष्टी, पूर किंवा सततचा पाऊस यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी संध्याकाळी मिळावी यासाठी आपण स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याशी पत्रव्यवहार करून व्यक्तीशः भेट घेऊन मागणी केलेली होती जिल्हाभरात ६ लाख ३८ हजार ७९७ एकर चे झाले नुकसान झालेले असून त्यासाठी सुमारे ४१२.३० कोटी रुपये नुकसान भरपाई ची मागणी करण्यात आली असून भरपूर व मंठा तालुक्यात झालेल्या नुकसान भरपाईसाठी ८८.८९ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली असल्याची माहिती लोणीकरांनी दिली.

महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार हे सर्वस्वी शेतकऱ्यांना समर्पित असे सरकार असून शेतकऱ्यांच्या अडीअडचणीच्या काळात खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहणारे सरकार आहे त्यामुळे मागील काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे किंवा सततच्या पावसामुळे जे नुकसान झाले असेल त्याची नुकसान भरपाई शासनामार्फत लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल असा विश्वास माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.



मंठा तालुक्यातील ६१५३० तर परतुर तालुक्यातील ४५४५९ अशा एकूण १०६९८९ शेतकऱ्यांनी पिक विमा मिळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने तक्रार दाखल केली आहे तसेच तालुक्यातील १०७५४७ शेतकऱ्यांनी भरलेला असून त्यामध्ये ६६ हजार १३४ हेक्टर जमिनीचा पिक विमा काढण्यात आलेला आहे भरपूर तालुक्यातील ८४ हजार ५५२ शेतकऱ्यांनी ५४ हजार ४७० हेक्टर एवढा पिक विमा काढलेला आहे अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

## संपादकीय

# ‘आखाता’तील संघर्ष वाढणार

मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यातच हमासने इस्राईल वर हल्ला करून इस्राईलचे १२०० हून अधिक नागरिकांची हत्या करून २५१ नागरिकांचे अपहरण केले होते. हमासच्या या हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून इस्राईलने गाझा पट्टीवर वर हल्ला करून गाझा पट्टी अक्षरशः जमीनदोस्त केली. इस्राईलने केलेल्या हल्ल्यात ४२ हजारांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून हमासचे १२ हजारांहून अधिक दहशतवादी ठार झाले आहेत. इस्राईल - हमास युद्धाला आज एक वर्ष पूर्ण झाली तरीही त्यांच्यातील संघर्ष संपलेला नाही. इस्राईल - हमास युद्धाला एक वर्ष पूर्ण होत असतानाच इस्राईलने लेबनॉनवर हल्ला केला. इस्राईलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यात लेबनॉन मधील हिजाबुल्ला या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असलेल्या हसन नसराल्ला हा ठार झाला. त्या अगोदर इस्राईलने लेबनॉनवर पेजर आणि वोकिटॉकी हल्ला केला होता. इस्राईलने लेबनॉन वर हल्ला करण्यामागचे कारण म्हणजे लेबनॉन हमासला करीत असलेले आर्थिक आणि लष्करी सहाय्य. लेबनॉन मधील हिजबुल्ले इस्राईल - हमास युद्धात हमासला आर्थिक आणि लष्करी सहाय्य पुरवत होते इतकेच नाही तर काही हिजबुल्ले प्रत्यक्ष युद्धातही सहभागी झाले होते त्यामुळे त्यांना धडा शिकवण्यासाठी इस्राईलने लेबनॉनवर हल्ला करून हीजबुल्लाना लक्ष केले. इस्राईल - हमास नंतर इस्राईल - लेबनॉन संघर्षाने जग चिंतेत पडले असतानाच या संघर्षात इराणने उडी घेऊन संघर्षाची व्याप्ती आणखी वाढवली फक्त संघर्षाची व्याप्ती वाढवली नाही तर जगाची चिंताही वाढवली कारण इराण हा अरब देशातील किंबहुना इस्लामिक देशातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा देश आहे. इस्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतल्याने हा संघर्ष आणखी वाढणार हे स्पष्ट झाले. इस्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतली असा उल्लेख मी वर केला आहे त्याचे कारण इराण या युद्धात उडी घेईल असा अंदाज गेली वर्षभर लावला जात होता कारण इस्राईल - इराण संघर्ष जगाला नवीन नाही. या आधीही या दोन देशात युद्धाचा भडका उडाला आहे. १९८० सालच्या दशकात तर दोन देशात कायम युद्धाच्या ठिणग्या पडत होत्या त्यामुळे या युद्धात इराण केंव्हाही उडी घेईल असे म्हंटले जात होते ते खरे ठरवत इराणने इस्राईलवर हल्ला करीत २०० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली. अर्थात इस्राईलने या हल्ल्याचा यशस्वी बचाव केला. यात इस्राईलची म्हणावी तशी हानी झाली नसली तरी या हल्ल्याचा बदला घेतला जाईल असा इशारा इस्राईलने दिला आहे. याचाच अर्थ आगामी काळात इस्राईलकडून इराणवर हल्ला करण्यात येईल आणि जर तसे झाले तर हे युद्ध आणखी वाढू शकेल त्यात अमेरिकेने नेहमीप्रमाणे यात नाक खुपसले आणि इस्राईल पाठिंबा दिला. अमेरिकेने इस्राईलला पाठिंबा दिल्याने इराण आणखी खवळला कारण इराण इस्राईल प्रमाणे अमेरिकेलाही आपला शत्रू मानतो. अमेरिकेत सध्या निवडणुकीची लगबग चालू आहे. या निवडणुकीत राष्ट्राध्यक्ष पदासाठी उभे असलेले डोनाल्ड ट्रम्प यांनी तर इस्राईलला चिथावणी देत म्हंटले आहे की इस्राईलने इराणच्या आण्विक तळावर आणि तेलाच्या विहिरींवर हल्ला करावा. जर मी म्हणजे ट्रम्प जिंकून आलो तर इस्राईलच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून इराणला त्यांची जागा दाखवून देईल. उद्या जर डोनाल्ड ट्रम्प खरेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनले तर हा संघर्ष आणखी वाढेल. अमेरिकेने आजवर प्रत्यक्ष युद्धात उतरून इस्राईलला साथ दिलेली नाही मात्र डोनाल्ड ट्रम्प जर निवडून आले तर ते इस्राईलच्या बाजूने



प्रत्यक्ष मैदानात उतरू शकतात आणि जर तसे झाले तर आजवर या युद्धात तटस्थ राहिलेले इजिप्त, जॉर्डन, सीरिया, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती हे अरब राष्ट्रे इराण ला साथ देण्यासाठी मैदानात उतरील आणि जर तसे झाले तर ती तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात ठरेल म्हणूनच हा संघर्ष आणखी वाढू न देण्याची खबरदारी जगाने घ्यावी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मनरेगाअंतर्गत बांबू लागवडीकरिता हेक्टरी सात लाख अनुदान प्रस्ताव मंजुरीला सुरुवात

## बांबू लागवड चळवळीचे समन्वयक डॉ. सुयोग कुलकर्णी यांच्या प्रयत्नांना यश

**जालना । प्रतिनिधी** - शाश्वत उत्पन्न देणाऱ्या बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना मनरेगा अंतर्गत हेक्टरी सात लाखाचे अनुदान दिले जात असून, प्रस्ताव मंजुरीला जिल्ह्यात सुरुवात झाली आहे. शेतकरी या योजनेचा मोठ्या संख्येने लाभ घेत असून, यासाठी बांबू लागवड चळवळीचे जिल्हा समन्वयक डॉ. सुयोग कुलकर्णी प्रस्ताव तयार करून देण्यापासून ते विविध कार्यालयातील प्रक्रिया पूर्ण करून देण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करत आहेत. त्यापैकीच घनसांगी तालुक्यातील ढाकेफळ येथील शेतकरी विश्वंभर माळोदे यांच्या शेतात आज रविवार दि. ६ ऑक्टोबर रोजी बांबू लागवडीचा शुभारंभ डॉ. सुयोग कुलकर्णी यांच्याहस्ते करण्यात आला.

याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी डॉ. सखाराम पवळ, कृषी पर्यवेक्षक संजय लोंढे, कृषी सहाय्यक कदम, मंडळ कृषी अधिकारी बिराजदार, प्रगतशील शेतकरी भरत मंत्री, योगेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. पवळ म्हणाले की, शेतकऱ्यांना बांबू लागवडीचे महत्त्व पटू लागले आहे. मनरेगा योजनेअंतर्गत हेक्टरी सात लाखाचे अनुदान मिळू लागल्याने शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत, कृषी विभागाकडे २५० हेक्टरसाठी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी जिल्ह्यातील बांबू लागवड क्षेत्राची माहिती देऊन, बांबू लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचा भविष्यकाळ उज्वल असून, सरकारने बांबू लागवडीचा मनरेगात समावेश केल्याने, चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत एक तरी सात लाख अनुदानासाठी जिल्ह्यात ५०० हेक्टर क्षेत्राकरिता प्रस्ताव प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी बांबू लागवडीची चळवळ हाती घेतले असून, देशभर जनजागृती करत आहे. बांबू शेतीचे महत्व फोटो लागल्याने शेतकरीही मोठ्या प्रमाणात लागवड करत आहेत. डॉ. कुलकर्णी जिल्हा समन्वयक म्हणून जालना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करत आहेत. यांच्या प्रयत्नामुळे आतापर्यंत ५०० हेक्टरमध्ये बांबू लागवड झालेली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नाने बांबू लागवडीचा मनरेगात समावेश करण्यात आलेला असून हेक्टरी सात लाखाचे अनुदान दिले जात आहे. त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी डॉ. कुलकर्णी हे विशेष प्रयत्न करत असून, प्रस्ताव तयार करणे, विभाग, पंचायत समिती अधिकाऱ्यालयातील प्रक्रिया पूर्ण करून देण्यासाठी ते शेतकऱ्यांना विशेष मदत करत आहेत.



या कार्यक्रमाला ढाकेफळ सरपंच दत्तात्रय गाढवे, रोजगार सेवक विष्णू पवार, माजी चेअरमन बाबासाहेब माळोदे, प्रगतशील शेतकरी कैलास चांदर, चक्रधर माळोदे, योगेश चांदर,शिवराम चांदर, परमेश्वर गाढवे, योगेश माळोदे, विश्वंभर माळोदे यांच्यासह पंचक्रोशीतील शेतकरी उपस्थित होते.

# शंभर शिक्षक समूहच्या नवरात्र उत्सवानिमित्त ईबीके शाळेत चित्रकला स्पर्धा संपन्न

**टेंभुर्णी । प्रतिनिधी** - जल्ह्यातील शंभर शिक्षक समूह सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. या शंभर शिक्षक समूहातर्फे दरवर्षी नवरात्र उत्सवानिमित्त नऊ दिवस वेगवेगळे उपक्रम साजरे केले जातात. यावर्षी ग्रामीण भागातील शाळांना यामध्ये समाविष्ट करून घेण्यात आलेली आहे. या समार्फत चित्रकला स्पर्धेचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते शंभर शिक्षक क्लब जालना, यांच्या वतीने आयोजित चित्रकला स्पर्धेत टेंभुर्णी ता. जाफराबाद जि.जालना येथील सेठ एकनाथ भगवानदास काबरा उर्दू विद्यालयातील ५० विद्यार्थ्यांनी आज ४ऑक्टम्बर शुक्रवार रोजी सहभाग नोंदवित मेरा भारत महान, झाड़े लावा झाड़े जगवा, राष्ट्रीय एकात्मता या तीन विषयावर सुंदर असे चित्र काढले. या चित्रकला स्पर्धेचे आयोजन ए बी के शाळेत केल्यानंतर चित्रकला शिक्षक साबीर सर यांनी उत्कृष्ट नियोजन केले. या नियोजनाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून मुले आनंदी होती.




# डरकाळी पेक्षा चाणक्यनिति योग्य

उद्धव ठाकरे यांनी रोजगार योजना अस्तित्वात आणून फार मोठे काम केले यात शंका नाही ,कारण ती काळाची गरज होती आणि शिवसेनेचे धोरणच राबवले ह्या बद्दल त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे.उद्धव ठाकरे एकनाथ शिंदेच्या गद्दारीमुळे व अतिविश्वास टाकल्यामुळे फार व्यथित झाले हे जरी खरे असले तरी,स्वर्गीय आर आर पाटील व अनंत तरे ह्यांनी वेळीच सावध करूनसुद्धा गाफील का राहिले ह्याच कधी तरी आत्मचिंतन केले पाहिजे होते.आगाऊ कल्पना सूत्रांकडून मिळूनसुद्धा शिंदेंना एकटे पाडून बंड कोणत्याही परिस्थितीत मोडून काढणे गरजेचे होते.शिंदे सोबत चाळीस आमदार का गेले,कशासाठी गेले,त्यांच्यावर कोणाचा आणि कसला दबाव होता हे लपून राहिलेले नाही.उद्धव ठाकरे ह्यांनी जाहीर सभेतून वाघासारखी डरकाळी फोडून प्रत्येकवेळेला मोदी शहा फडणवीस शिंदे यांची दगाबाजीची लक्तरे वेशीवर टांगली ते योग्य आणि काळाची गरज होती.जनतेची वाढती सहानुभूती शिवसेनेला मिळत आहे. त्याचा परिणाम लोकसभेच्या निवडणुकीत दिसून आला तरी शिवसेनेला म्हणावे तसे यश मिळाले नाही.

ते यश काँग्रेस आणि राष्ट्रवादीने मिळवले. काँग्रेस हत्तीच्या चालीने देशभर वाढत चालली आहे तर राष्ट्रवादीचे शरद पवार आक्रस्ताळीपणा न करता संयमाने,खुबीने,राजकीय चाणक्यनीतीचे कसब वापरून अजित पवारांचे राजकीय खच्चीकरण करताना पक्षाची बाजू मजबूत करीत आहेत. प्रसंगी ते राजकीय शत्रूंच्या घरी जाऊन दिलजमाई करून बेरजेचे राजकरण करतात ह्या त्यांच्या कासवाच्या चालीचा वेग उद्देश गाठणारा आहे.उद्धव ठाकरे मात्र हा संपूर्ण महाराष्ट्रच माझा आहे मीच ह्याचा कर्ता करविता ह्या अति आत्मविश्वासाने सशासारखे



दौडत आहेत आणि ते शिवसेनेला घातकच नव्हे तर सर्वात पिछाडीवर नेणारे आहे.म्हणून मुख्यमंत्र्यांचा चेहऱ्याची मागणी करून त्याला दोन्ही काँग्रेस पार्टीने वाटाण्याच्या अक्षता लावून भ्रमनिरास केला.जशी भाजप संधीसाधू होती तशी दोन्ही काँग्रेस पार्टी शिवसेनेच्या मतांचा उपयोग करून घेण्यासाठी सज्ज आहे.उद्धव ठाकरे यांची गद्दारांना क्षमा नाही,त्यांना पक्षात घेणार नाही हि भूमिका सत्तेतआल्यावर त्याचा समाचार घेतला जाईल हा विचार पक्षाला घातक आहे.सुडाची भावना हि बोलून दाखवण्याचा काळ निघून गेला ह्याच भान ठेवणे गरजेचे आहे. त्यापेक्षा शरद पवारांसारखे बेरजेचे राजकारण करून जे आमदार खासदार नेते कार्यकर्ते चुकले आहेत त्यांना पक्षात परत यायचे आहे त्यांना सन्मानाने पक्षात घेतले तर पक्ष मजबुतीने पुढे येउन स्वतःचे भक्कम स्थान निर्माण करू शकतो. शिंदे, शिरसाट गोगावले,शंभूराजे,सत्तार,बांगर सारखे जे कृतघ्न नेते आहेत त्यांना साम दाम दंड भेद चा सुगावा न लागता कसे धारातीर्थी पाडता येईल अशी मोर्चे बांधणी करून त्यांना नेस्तनाभूत कसे करता येईल असे राजकारण करणे हि शिवसेनेची गरज आहे. शिवसैनिक,चाहते, कार्यकर्ते,ह्यांच्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तजवीज करणे आवश्यक आहे कारण काळ बदलला आहे.महागाई बेरोजगारीनी मराठी माणूस,शिवसेनाप्रेमी बेजार आहे.हीच वेळ आहे अस्तित्व टिकवण्याची. उद्धव ठाकरे,राज ठाकरे यांनी मराठी माणसासाठी राज्यहितासाठी,अहंकार,मागचे सर्व कटू अनुभव,प्रसंग विसरून एकत्र आले तर महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्ष केराच्या टोपलीत महाराष्ट्राची जनता टाकेल.अन्यथा महाराष्ट्रात कालांतराने हेच स्वार्थी पक्ष शिवसेना मनसे संपवल्याशिवाय राहणार नाही.म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण,काळ सोकावता कामा नये. उद्धव ठाकरेंकडे कमालीचा जोश आहे पण राजकीय धुरंधर चाण्यक्यनीतीत कमी पडतात बाळासाहेबांच्या शिवसेना अबाधित राहण्यासाठी उद्धवजींनी ताठरपणा सोडावा.मनाचा मोठेपणा दाखवत पक्ष हितासाठी उद्धवजींनी प्रशांत किशोर, योगेंद्र यादव, अशोक वानखेडे, निरंजन टकले, निखिल वागळे, असीम सरोदे, विश्वंभर चौधरी तसेच रोखठोक वृत्तपत्र लेखक दत्ता खंदारे, यशवंत चव्हाण, विजय कदम, मालवणकर, गाडेकर, अनंत आंगचेकर, खटावकर. दत्तप्रसाद शिरोडकर, राजन देसाई व समविचारी यांची एक बैठक घेऊन त्यांचा सल्ला घेतला तर शिवसेनेला भरघोस मतदान होऊ शकते. शिवसैनिकांच्या जाहीर सभेत डरकाळी फोडून मतांची बेरीज होणार नाही. कारण महाआघाडीत सुद्धा अस्थानीतले साप आहेत. शिंदेनी स्वतःच्या फायद्यासाठी सत्तेचा दणक्यात उपयोग करून घेतला त्यांना कमी लेखून चालणार नाही त्यांनी उद्धव ठाकरेंना राजकारणातून संपवण्याचा कुटील डाव रचला असणार यात शंका नाही. विरोधकांना धोबीपछाड देण्यासाठी शरद पवारांसारखे राजकारण करा. जोश के साथ होश रखना जरुरी है. उद्धव ठाकरे यांनी उघडा डोळे पहा नीट हे तत्व अवलंबवावे हि सदिच्छा.



**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर**

## पान १ वरुन

### जनतेचा विश्वास ...

संगीताताई गोरंट्याल म्हणाल्या की, आपल्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात स्वच्छतेसह नागरी मूलभूत सुविधा पुरविण्यावर भर दिला. विशेष करुन स्वच्छतेबाबत प्रशासनाच्या मदतीने प्रभावीपणे काम केल्याने नागरिकांचे आरोग्य अबाधित राहिले.

कार्यक्रमास सीताराम टकले, सुधाकर छडीदार, श्रावण ढवळे, चंद्रकांत जाधव, कैलास वाघ, बाबूलाल गायकवाड, मुकुंद नारियलवाले, अंकुश साळुंखे, बन्सीलाल ढवळे, सुरेश नारियलवाले, सुदेश वैष्णव, संतोष भवर, दीपक जांगडे, आसाराम ढवळे, अनिल सोनटक्के, चंद्रकांत जांगडे, अनिल कोकणे, कृष्णा भवर, शशिकांत भवर, प्रकाश शिंदे, अख्तर कुरेशी, भोलेबा नारियलवाले, सुरेश छडीदार, जगन्नाथ गोधेकर, रोहित वाघ, शुभम मोरे आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन विकास भिसे यांनी केले, तर योगेश पाटील यांनी आभार मानले.

### महिला सुधारगृहातून ...

पोलीस ठाण्यात दुपारी दीड वाजेच्या दरम्यान याबाबत तक्रार देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावर जाऊन घटनेची पाहणी केली. तालूका पोलीस ठाण्याचे दोन पथक सदरील तरूणीचा शहरातील वेगवेगळ्या परिसरात शोध घेत होती.

दरम्यान, दुपारी अडीच वाजेच्या सुमारास एक मुलगी मोतीबाग येथे तर दुसरी तरुणी जिल्हा शासकीय रूग्णालयात मिळून आली. दोन्ही मुलींची वैद्यकिय तपासणी करण्यात आली असून मुलींना पोलीसांनी ताब्यात घेतले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सुरेश उनवणे यांनी दिली आहे. पुढील तपास तालुका पोलीस करत आहे.

### एक स्कार्पिओ ...

असता ते जालना शहरात विद्युत ट्रासफार्मर (डि.पी.) चोरी करण्याकरीता आले असल्याचे समजले. हारुन ईस्माईल कुरेशी (वय ३२ वर्षे) रा. सिलीखाना बडा तकीया, छत्रपती संभाजीनगर, अर्जुन प्रितीसिंग कलाणी, (वय ३८ वर्षे), रा.भरतनगर, नवीन मोंढ्याच्या पाठीमागे, जालना, जितुसिंग संतोषसिंग टाक (वय ३३ वर्ष) रा. अलाना ता.जि. छत्रपती संभाजीनगर, किसनसिंग रामसिंग टाक (वय ३१ वर्षे) रा.व्दारकानगर, जालना असे चोरट्यांची नावे आहेत. त्यांचे आणखी दोन जोडीदार पळून गेले आहेत. महात्मा फुले भाजी मार्केट, जालना येथील मारहाण झालेल्या वॉचमनला बोलवुन त्यांच्याकडे केलेल्या चौकशीतून सदर बाजार पोलीस ठाणे, जालना येथे कलम ३१० (०२),३०३ (०२) भारतीय न्याय संहिता सह कलम ०४/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे रविवार (दि ६) रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोउपनि श्रीमती शिंदे करीत आहेत.

या कारवाईत एक स्कार्पिओ, एक विद्युत ट्रासफार्मर (डि.पी.) व एक धारदार खंजीरसह एकुण ९ लाख पन्नास हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन चार आरोपी ताब्यात घेण्यात आलेले आहेत. त्यांना विश्वासात घेवुन अधिक चौकशी केली असता त्यांनी यापुर्वी सुध्दा सदर बाजार हददीतील जुनी एमआयडीसी/पावरलूम येथे चोरी केल्याची कबुली दिली असल्याची माहिती सदर बाजार पोलिसांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप भारती, पोलीस निरीक्षक उनवणे, तालुका पोस्टे, डी.बी पथक प्रमुख पोउपनि भगवान नरोडे, पोहेकॉ जगन्नाथ जाधव, पोहेका धनाजी कावळे, पो नजीर पटेल, पोका.दुर्गेश गोफणे, गणेश तेजनकर, चालक सपोउपनि शेख व कल्पेश पाटील यांनी पार पाडली आहे.





नवीन जालन्यातील दुर्गा माता मंदिरातील दुर्गा मातेची देखणी मूर्ती पहिल्या छायाचित्रात दिसत आहे. दुसऱ्या व तिसऱ्या छायाचित्रात दुर्गामाता पसिरात भरलेल्या जत्रेत विविध खेळ पाळणे तसेच खरेदीसाठी गर्दी होतांना दिसून येत आहे. (छाया- किरण खानापुरे)

भगवान महावीर यांच्या जीवन चरित्रावर शालेय निबंध स्पर्धेला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

# शाळांनी जिल्हास्तरीय समितीकडे बुधवारपर्यंत निबंध सादर करावेत - लव्हाडे

**जालना । प्रतिनिधी -** प्रभू महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वानोत्सव वर्ष उजवनीनिमित्त महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, श्री भगवान महावीर स्वामी निर्वाण महोत्सव समितीच्यावतीने भगवान महावीर यांच्या जीवन चरित्रावर शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित निबंध स्पर्धेला जालना जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, शाळांच्या मुख्याध्यापकांनी हे निबंध जिल्हास्तरीय समितीकडे ९ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत, असे आवाहन सदस्य संजय लव्हाडे यांनी केले आहे.

यासंदर्भात श्री. लव्हाडे म्हणाले की, पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा दोन गटात ही निबंध स्पर्धा शाळांच्या देखरेखीखाली घेण्यात आली. जालना जिल्ह्यात या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेसाठी राज्य स्तरावर या दोन्ही गटासाठी २५ लाख ५० हजाराचे पारितोषिक दिले जाणार आहे. राज्यस्तरावरील पाचवी ते सातवी गटासाठी पहिले बक्षीस ३ लाख ३३ हजार ३३३ रुपये, द्वितीय २ लाख २२ हजार २२२, तृतीय पारितोषिक १ लाख ११ हजार १११, आठवी ते दहावी गटासाठी प्रथम पारितोषिक ४ लाख ४४ हजार ४४४, द्वितीय पारितोषिक ३ लाख ३३ हजार ३३३ तर तृतीय पारितोषिक २ लाख २२ हजार २२२ रुपयाचे दिले जाणार आहे. याशिवाय जिल्हास्तरावरही पाचवी ते सातवी गटासाठी प्रथम पारितोषिक ५ हजार ५५५, द्वितीय पारितोषिक ३ हजार ३३३, तृतीय पारितोषिक २ हजार २२२, चौथे पारितोषिक १ हजार १११, पाचवे पारितोषिक ५५१ रुपये, आठवीचे दहावी गटासाठी गटासाठी प्रथम पारितोषिक ५ हजार ५५५,



द्वितीय पारितोषिक ३ हजार ३३३, तृतीय पारितोषिक, २ हजार २२२, तृतीय पारितोषिक १ हजार १११आणि पाचवे बक्षीस ५५१ रुपयाचे दिले जाणार आहे. जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी झालेल्या शाळांचा भगवान महावीर निर्वाण कल्याणक समितीच्यावतीने सत्कार करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने शाळांनी सहभागी विद्यार्थ्यांची संख्या दर्शविलेले पत्र आणि विद्यार्थ्यांचे निबंध जिल्हास्तरीय समितीचे सुदेश सकलेचा, वीरेंद्र रुणवाल, प्रमोद देसरडा, संजय लव्हाडे, ड. अनिल संचेती, अशोक संचेती, अजित छाबडा यांच्याकडे ९ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मारवाड़ी सम्मेलन तर्फे दानकुँवर विद्यालयात कन्यापुजन-भोजन



**जालना । प्रतिनिधी -** भारतीय संस्कृतीच्या रिती रिवाज व रुढी अखंडपणे चालू रहाव्यात, या उद्देशाने अखिल भारतीय मारवाड़ी महिला सम्मेलनच्या जालना-जिलाध्यक्ष सावित्रीदेवी मल्लावत यांनी दानकुँवर प्राथमिक विद्यालय येथे छोट्या छोट्या लहान मुलींना दुर्गा स्वरुप सजून आलेल्या बालिकेंचे सम्मेलन च्या सर्व सदस्यांनी पुष्प वर्षा करुन स्वागत करुन कन्यापुजन केले व मंगल गीत गावून कन्या भोजन चा कार्यक्रम १०० जणांच्या उपस्थितीत दांडिया रास महोत्सव चा कार्यक्रम संगीत वाद्ययंत्राच्या तालावर घेण्यात आला. यावेळी सम्मेलन च्या अध्यक्षा सावित्रीदेवी मल्लावत, स्मिता चेचाणी, तारा शर्मा उमा पित्ती, चंदा कर्वा सुनिता मलपाणी मधुलता भक्कड अनिता बंसल पुष्पा निमोदिया निमोदीया सीमा देवीदान कविता पित्ती प्रेमा अग्रवाल शोभा खंडेलवाल आणि इंदु भारूका ईत्यादींनी दांडिया रास मध्ये भाग घेवून कार्यक्रमा चा आनंद हर्षोल्लासा ने साजरा केला.

# सप्टेंबरमधील अतिवृष्टीच्या अनुदानातून जालना जिल्हा वगळला; स्वाभीमानीकडुन निर्णयाची होळी

**जालना । प्रतिनिधी -** सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीच्या अनुदानातून जालना जिल्हयाला वगळण्यात आल्यानं स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं सोयाबीनच्या शेतात नेऊन शासन निर्णयाची होळी केली आहे.

एक आणि दोन सप्टेंबरला जालना जिल्ह्यात सर्वच महसूल मंडळात मुसळधार पाऊस होऊन शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचं नुकसान झालं होतं.

नुकसान झालेल्या पिकांमध्ये कपाशी,सोयाबीन, तूर,टोमॅटो,मिरची, मका यांसह भाजीपाला तसंच फळबागांचेही मोठं नुकसान झालं होत. ४ ऑक्टोबरला शासन निर्णयात ९९७ कोटी रुपयांची मदत अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांना जाहीर करण्यात आली.

मात्र यात जालना जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळं शासनाचा निषेध करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं शासन निर्णयाची होळी केली आहे. तसेच सरकारचा जाहीर निषेध नोंदवला आहे.



## लाडकी बहिण योजना; लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने वाढविणार - मुख्यमंत्री

**छत्रपती संभाजीनगर -** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही नेहमी सुरु रहावी यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात आली असून ही योजना बंद तर पडणार नाहीच उलट लाभाची रक्कम ही टप्प्या-टप्प्याने वाढविण्यात येईल,असा शब्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे आपल्या लाडक्या बहिणींना दिला.

छत्रपती संभाजीनगर येथे खडकेश्वर परिसरात मराठवाडा सांस्कृतिक मंडळ मैदान येथे 'मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान' अंतर्गत 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान' आणि 'राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा' मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडला.

# लॉयन्सच्यावतीने कल्पना लाहोटी यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** सध्या लॉयन्स सेवा सप्ताह साजरा करण्यात येत असून, त्या अंतर्गत लायन्स क्लब ऑफ जालना गोल्डच्यावतीने महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणाऱ्या माजी नगराध्यक्ष सौ. कल्पना सुनील लाहोटी यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी क्लबचे अध्यक्ष अशोक मिश्रा, प्रकल्प प्रमुख अशोक हुरगट, सहप्रकल्प प्रमुख रामकुवर अग्रवाल, ओमप्रकाश धानवाला, केदार करवा, सुनील लाहोटी, लक्ष्मीनारायण मानधना आदींची उपस्थिती होती.

यावेळी अशोक हुरगट म्हणाले की, एक सक्षम नगराध्यक्षा म्हणून संकल्पना लाहोटी यांचा कार्यकाळ राहिलेला असून, त्यांच्या कारकिर्दीत अनेक विकास कामे मार्गी लागली. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या माध्यमातून त्या सेवाभाव जपत असून, महिला सक्षमीकरणासाठी त्यांचे राहिलेले योगदान विचारात घेऊन, लॉयन्स सेवा सप्तांतर्गत त्यांचा गौरव करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात क्लबचे अध्यक्ष अशोक मिश्रा यांनी क्लब च्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

श्री मुंगसाजी महाराज पतसंस्थेची आमसभा

# सहकार बळकट असला तर परिसराचा विकास - राहूल बोंद्रे




**चिखली -** येथील श्री मुंगसाजी महाराज नागरी सहकारी पतसंस्थेची २१ वी वार्षिक सर्व साधारण सभा संस्थेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांच्या उपस्थितीत रविवार, २९ सप्टेंबर २०२४ रोजी मोठ्या उत्साहात पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दिपक देशमाने, माजी आमदार राहुल बोंद्रे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. संस्था लोकहित साधण्यासह जनसामान्यांच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याचे संस्थेचे अध्यक्ष दिपक देशमाने यांनी यावेळी सांगितले.

या आमसभेला माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी बोलताना सांगितले की, संस्थेने अत्यंत मेहनतीने नेत्रदीपक यश संपादन केले आहे. सहकार बळकट असला तर - परिसराचा विकास होतो. कुठलेही आर्थिक पाठबळ नसतांना केवळ ७४ हजार रुपये ठेवी घेऊन सुरु झालेली संस्था आज रोजी २०० कोटींच्या ठेवीवर पोहचली असून ही प्रगती आनंद द्विगुणीत करणारी आहे .

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्यार्याचा तसेच गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. तसेच श्री मुंगसाजी महाराज पतसंस्थेच्या एकूण १७ शाखेमधून सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या तीन शाखा प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षीस सन्मानचिन्ह शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक चंद्रकांत सुरडकर यांनी तर अहवाल वाचन सरव्यवस्थापक व्ही. एन. ठेंग यांनी तर आभार प्रदर्शन आनंद बोंद्रे यांनी मानले.

# भोकरदन विधानसभा मतदार संघातील प्रस्थापितांना या निवडणुकीत त्यांची जागा दाखवा - ॲड. भास्कर मगरे

**भोकरदन । प्रतिनिधी -** भोकरदन विधानसभा मतदार संघातील प्रस्थापितांना आजी-माजी आमदारांना या निवडणुकीतून त्यांची जागा दाखवा, असे रोखठोक आवाहन शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख तथा भुमिहिन कास्तकरांचे नेते ॲड. भास्कर मगरे यांनी केले. भोकरदन येथील खुला मैदानावर दलित आदिवासी भुमिहिन कास्तकर आणि शिवसेना दलित आघाडी कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी असलेले दलित आदिवासी भुमिहिन, कास्तकरांचे नेते तसेच जालना ते मुंबई भुमिहिन लाँग मार्च प्रणेते शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे होते.

यावेळी बोलतांना ॲड. मगरे म्हणाले की, राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तप्टे नावे करुन सातबारा देण्यात यावा या प्रमुख मागणीसह दलित आदिवासीच्या ज्वलंत प्रश्नांवर लोकशाही मार्गाने शेकडो आंदोलने मोठ्या जनसमुदायाने केले आहेत. मात्र शासन आणि प्रशासन दलित आदिवासींच्या उदरनिर्वाहचे प्रश्न महायुती सरकार राज्यात २०१४ पासून अस्तित्वात असताना गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून येत आहे. शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमानुसार १ एप्रिल १९७८ ते १४एप्रिल १९९० च्या दरम्यान व १४ एप्रिल १९९० ला अस्तित्वात असलेले शासकीय पडीत जमीनीवरील शेतीसाठी झालेले अतिक्रमण नियमानुकूलित करुन सातबारा उतारा देण्याची तरतुद आहे.

मात्र शासन आणि प्रशासन दलित आदिवासींच्या प्रश्नांवर उदासिन असल्याचे दिसून येत आहे. कायदेशिर बाब मांडायची झाल्यास याच अधिनियमाला धरुन सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय मुंबई आणि विधी मंडळात बहुमताने पास झालेले विधायक या सर्व बाबी अनुकूल असतांना प्रशासन दलित आदिवासी भुमिहिन कास्तपट्टे नावे करुन सातबारा उतारा देत नाहीत. १७ मार्च २०२४ रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधी मंडळात घोषणा करुन दलित आदिवासी शेतीसाठी झालेले अतिक्रमण नियमानुकूलित करुन सातबारा उतारा देण्याचे सुचित करुन देखील प्रशाासकीय अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या आदेशाला मानत नाहीत. याचाच अर्थ असा होते की, शासनाला दलित आदिवासी भुमिहिन कास्तकरांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवयाचा नाही. महायुती सरकार आल्यापासून राज्यात दलित आदिवासी जाती जमातीवर अत्याचारामध्ये वाढ झाली असून दलित आदिवासींना असुरक्षित वाटत आहे. ज्या दलित आदिवासी भुमिहिन लाभार्थ्यांना शासनाने सिलिंग ॲक्टमधील गायरान, जमीनी तसेच इनामी जमीनी कायद्याने प्रदान केलेल्या आहेत. त्या जमीनी महायुतीच्या काळात सन १५-१६ मध्ये संगणकीय यंत्रणेमध्ये सातबारावरील लाभार्थी नावासमोरील क्षेत्र पोटखराबीमध्ये दाखवित आहे. त्यामुळे बँक कर्ज देत नाहीत, तसेच शासनाचे लाभ मिळत नाहीत. यासाठी अनेक आंदोलने केली, मात्र काहीच बदल होत नाही. तसेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमानी योजना मृगजल ठरली आहे. अ.जाती व नवबौध्द घटकातील दारिद्रेरेषेखालील भुमिहिन कुटूंबांना ४ एकर जिरायती आणि २ एकर बागायती जमीन उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे. मात्र जिल्ह्यात नव्हे राज्यात कुठेच योजना राबवलेली दिसन नाही. तसेच सर्वांसाठी घरे २०२२-२४ मध्ये मागेल त्याला घर, लाभार्थी कुठेही राहत असेल त्याला निवारा नसेल तर शासनाचे घरकुल मंजुर करुन लाभार्थी ज्या ठिकाणी उदा. गावठाण, गायरानमध्ये राहत असेल तर त्याला त्या ठिकाणी घरकुल मंजुर करुन द्यावे. मात्र प्रशासकीय सदोष यंत्रणा ८ अ उतारा गावासाठी गरजुंना घरापासून वंचित ठेवीत आहेत. यावर शासनाने काही कारवाई करीत नाही. आणि म्हणून भोकरदन विधानसभा मतदार संघातील दलित आदिवासी आणि या आंदोलनातून जोडलेले सर्व सुज्ञान मतदार बंधू आणि भगिनींना माझी विनंती की आहे की, या निवडणुकीत प्रस्थापित आजी-माजी आमदाराला त्याची जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे. आणि आपला हक्काचा माणुस निवडून देण्याचा संकल्प आपण करु यात, असेही ॲड. भास्करराव मगरे म्हणाले. यावेळी प्रल्हाद साळवे, प्रभाकर हिवाळे, संजय घोरपडे, संदीप काकडे, रामकुंवर गोफणे, बिलाल शहा यांच्यासह दलित आदिवासी भुमिहिन कास्तकर आणि शिवसेना दलित आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



मराठा मावळा संघटनेच्या आंदोलनाला यश

# जालना बाजार समितीत अखेर शेतकऱ्यांच्या मुलांसाठीच्या वसतिगृहाचे लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी -** केवळ आर्थिक परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील मुलांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. गुणवत्ता आणि बुद्धीमत्ता असूनही ग्रामीण भागातील मुले स्पर्धेत मागे राहतात. अशा शेतकर्यांच्या मुलांसाठी जालनासारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी बाजार समितीच्या वतीने वसतीगृह उभारावे, अशी मागणी मराठा मावळा संघटनेच्या वतीने लावून धरली होती. या मागणीला यश आले असून, रविवारी या वसतीगृहाचा लोकार्पण सोहळा पार पडला.

शेतकर्यांच्या मुलांसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून वसतिगृह उभारण्यात यावे, अशी मागणी मराठा मावळा संघटनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष प्रा. माणिकराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कृउबाचे सभापती अर्जुनराव खोतकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. तसेच या मागणीच्या अनुषंगाने आंदोलनही करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत रविवारी वसतीगृहाचा लोकार्पण सोहळा पार पडला. या संदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले होते की, सद्या शेतकर्यांची आर्थीक परिस्थिती बिकट झाली असून पावसाअभावी शेतकर्यांची रब्बी पिके हातची गेली तर खरीप पिकाचीही गंभीर परिस्थिती निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत शेतकर्यांना आपल्या मुलांना शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी पाठविणे कठीण झालेले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात शिक्षण अर्ध्यात सोडविण्याची वेळ येत आहे. अशा परिस्थितीत शासनाने मुलांसाठी तात्काळ वस्तीगृह उभारण्यासाठी हालचाल सुरू केली तर निश्चितच शेतकर्यांच्या मुलांसाठी शिक्षण घेणे सोयीस्कर होईल, असे या निवेदनात म्हटले होते.या निवेदनावर युवा जिल्हाध्यक्ष संतोष भुतेकर, दादाराव गावंडे, महादेव कदम, आत्माराम गायकवाड, सतिष घारे, रमेश तुपे, वैष्णवी बोचरे, साक्षी मोहीते, साईराज पाटील, राहुल ढोरकुले, दिलीप बागल, भास्कर ढाकणे, राहुल भोसले, भाऊसाहेब जाधव, कृष्णा कबाडे, गोकुळ नौथर, बाळासाहेब काळबने आदींच्या आदी पदाधिकार्यांच्या स्वाक्षर्या आहेत.



वसतीगृहाच्या लोकार्पण सोहळा प्रसंगी बाजार समितीचे मुख्य प्रशासक तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते मराठा मावळा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संघटनेचे मराठावाडा कार्याध्यक्ष सतीश घारे, जिल्हाध्यक्ष रमेश तुपे आदी.

### निस्वार्थपणे केलेल्या प्रयत्नांना यश - प्रा. माणिकराव शिंदे

जालना कृषी उपन्न बाजार समितीकडून शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वसतीगृह उभारण्याची मागणी मराठा मावळा संघटनेच्या वतीने लावून धरली होती. या प्रयत्नांना अखेर यश आले असून, याचा मनस्वी आनंद होत आहे. आगामी काळात या वस्तीगृहात जागा वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रिया मराठा मावळा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माणिकराव शिंदे यांनी दिली.

# अतिवृष्टीची तात्काळ नुकसान भरपाई द्या; अन्यथा आंदोलन



**घनसावंगी । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाने ऑगस्ट व सप्टेंबर २०२४ या कालावधीत झालेल्या आतिवृष्टीमुळे शेतीचे नुकसान झालेल्या जिल्ह्यांना नुकसान भरपाई जाहीर केली आहे.या मधून जालना जिल्ह्याला वगळण्यात आल्यामुळे शेतकर्यावर प्रचंड अन्याय झाला आहे.

वास्तविक पहाता जालना जिल्हा व विशेषत:घनसावंगी तालुक्यामध्ये आतिवृष्टीमुळे शेतीचे,पशुधनाचे व अनेक ठिकाणी जिवितहानी झाल्याचे महसुल विभागाने कळवून सुध्दा शासनाने जालना जिल्हा मदती पासून वगळून जिल्ह्यावर अन्याय केला आहे.

सरकारने तात्काळ जालना जिल्ह्याला आतिवृष्टीचे आनुदान जाहीर करावे नसता लवकरच महाराष्ट्र शासनाच्या विरुद्ध जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे तीव्र अंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे नेते माजीमंत्री आ.राजेश टोपे व खा.संजय जाधव यांनी असंख्य शेतकरी, कार्यकर्त्यांसह जाऊन तहसीलदार,घनसावंगी यांना दिलेल्या निवेदनातून केला आहे.

यावेळी उपस्थित शेतकर्यानी महायुती सरकारच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या.

# परतूर येथे वंचित बहुजन आघाडीची आढावा बैठक संपन्न



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील इंदिरा मंगल कार्यालय,येथे परतुर व मंठा तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विधानसभेचे नियोजित उमेदवार राम प्रसाद थोरात यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली. तीस वर्षाचा राजकारणातील दांडगा अनुभव असलेले उमेदवार आहेत. यामुळे त्यांनी बाळासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत वंचित बहुजन आघाडी मध्ये अधिकृतरित्या मनमाड येथे प्रवेश केला आहे, यावेळी परतुर तालुका,परतुर शहर, मंठा तालुका, कार्यकारिणीच्या वतीने त्यांचा भव्य-दिव्य असा सत्कार करण्यात आला. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकरांच्या परखड भूमिकेमुळे व ओ.बि.सी.समाजाला व बहुजन समाजाला तेच न्याय देऊ शकतात असं ठाम मत झाल्यामुळे वंचित बहुजन आघाडी मध्ये आलो असल्याचे त्यांनी यावेळी उपस्थितांना सांगितले.मी जर निवडून आलो तर वंचित समाजाचे इमानदारीने काम करणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले, पुढे म्हणाले परतूर मतदारसंघांमध्ये शिक्षणाची फार मोठया प्रमाणात पोकळी निर्माण झाली आहे,व केवळ रस्ते बनविणे, नाल्या बनवणे म्हणजे विकास नाही. उत्तम दर्जाचे शिक्षण, आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवर वंचित बहुजन आघाडीचे दीपक डोके, डॉ.किशोर त्रिभुवन,श्रीकांत राठोड, परमेश्वर खरात,शिवाजी डोळस, चोखाजी सौंदर्य, देवीदास कोळे,गौतम खंडागळे राजेंद्र वांजुळे, परमेश्वर पोटे,

रोहन वाघमारे यांची उपस्थिती व हाजारो कार्यकर्ते उपस्थित होती.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंठा तालुका अध्यक्ष सुभाष जाधव, परतूर तालुका अध्यक्ष रवी भदर्गे, परतूर शहराध्यक्ष राहुल नाटकर,प्रदीप साळवे,प्रशांत वाकळे, मनोज वंजारे, दीपक हिवाळे यांनी अतोनात प्रयत्न केले. सूत्रसंचालन राहुल नाटकर यांनी केले तर आभार मंठा तालुका अध्यक्ष सुभाष जाधव यांनी मानले.

# जालना-नांदेड समृध्दी महामार्गावरील संपादीत जमीनीला वाढीव मोबदला द्या; ॲड. कऱ्हाळे शेतकऱ्यांसाठी मैदानात

**जालना । प्रतिनिधी -** नांदेड समृध्द महामार्गावरील संपादीत जमीनीला अत्यंत कमी दर देण्यात येत असल्याने हा शेतकर्यावर अन्याय आहे. त्यामुळे सरकारने शेतकर्यांना वाढीव मोबदला देण्यासाठी कोरोना काळात केलेले गॅजेट रद्द करावे आणि शेतकर्यांना मुंबई-नागपूर या समृध्दी महामार्गा प्रमाणेच मोबदला देण्यात यावा अशी मागणी ॲड. भाग्यश्री कर्हाळे यांनी केली असून शेतकर्यांच्या मागण्या आणि आंदोलनाला त्यांनी जाहिर पाठींबा दिलाय.

जालना-समृध्दी महामार्गात संपादीत होणार्या शेतजमीनीचा मावेजा अत्यंत कमी दराने मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झालेत. त्यांना योग्य आणि मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाप्रमाणेच मावेजा मिळाला पाहिजे यासाठी शेतकरी शासन दरबारी खेटा घालीत आहेत. परंतु, त्यांच्या मागणीकडे सरकार लक्ष देत नसल्याने त्यांनी दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी उप विभागीय अधिकारी कार्यालयासमोर भिक मागो आंदोलन केलं. यावेळी भाग्यश्रीक कर्हाळे यांनी भेट देत शेतकर्यांना पाठींबा दिला.



नागपूर - मुंबई समृध्दी महामार्गात जो मोबदला मिळाला तो नांदेड-जालना या महामार्गाला देण्यात आलेला नाही. या महामार्गाला अत्यंत कमी दर देण्यात आलेला आहे. शासनाने जे गॅजेट काढले ते कोरोना काळात काढले आहे. त्यामुळे त्या काळातील मोठ्या खरेदी उपलब्ध नव्हत्या, त्यामुळे शेतकर्यांचे अत्यंत नुकसान झाले आहे. शेतकर्यांना वाढीव मोबदला द्यायचा असेल तर कायदेशीर बाजू म्हणून सरकारने लागू केलेले गॅझेट रद्द करणे आवश्यक आहे. शिवाय वाढीव मोबदल्यासह २१ दिवसाच्या आत शेतरकर्यांच्या खात्यावर पैसे जमा होणे अत्यंत आवश्यक आहे. ८०% शेतकर्यांनी जमीन देण्यास नकार असल्याचे अर्ज दिलेले आहेत, परंतु, त्यावर आजपर्यंत कुठल्याही प्रकरची सुनावणी झालेली नाही, असेही ॲड. भाग्यश्री कर्हाळे यांनी म्हटले आहे.

# शाहू महाराज प्रतिभा गौरव पुरस्काराने शेख इब्राहिम सन्मानित

**जालना । प्रतिनिधी -** कोल्हापूर येथील ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अतुल्य भारत प्रतिभा संमेलनाच्या वतीने दिला जाणाऱ्या छत्रपती शाहू महाराज प्रतिभा गौरव पुरस्काराने जालना येथील सामाजिक कार्यकर्ते इब्राहिम शेख रसूल यांना रविवारी ( दि.७) कोल्हापूर येथे सन्मानित करण्यात आले.

कोल्हापूर येथील दसरा चौकातील शाहू स्मारक सभागृहात आयोजित या कार्यक्रमात सुप्रसिद्ध अभिनेता मिलिंद दस्ताने यांच्या हस्ते शेख इब्राहिम यांना. शाहू महाराज प्रतिभा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी कोल्हापूर येथील धर्मादाय उपायुक्त शिवराज नायकवाडे ,महाराष्ट्र सुरक्षा बलाचे पोलीस निरीक्षक अवधूत ढोकरे, कार्यक्रमाचे आयोजक डॉ.बी एन खरात यांची यावेळी विशेष उपस्थिती होती.



शिव जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष,करम -ए -सैलानी संस्थेचे अध्यक्ष, अंजनी फाउंडेशनचे मार्गदर्शक म्हणून शेख इब्राहिम हे सातत्याने सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. कोरोना महामारी च्या काळात त्यांनी गरजू लोकांना मदत करण्याचे मोलाचे कार्य केले आहे. जालन्यातील सामजिक सलोखा जपण्यासह सतत दहा वर्षापासून रक्तदान शिबिराच्या माध्यमातून हजारो रुग्णांना मदत कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते म्हणून शेख इब्राहिम यांची ओळख आहे






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.